Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 238 – 240
DOI: 10.5281/zenodo.10115561

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार

सोनाली सुरेश पेकम

संशोधक विद्यार्थी, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sonali.pekam@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

एक संपूर्ण समतावादी समाज निर्माण करावा असे गांधीजींचे स्वप्न होते. समाजावर एकुणच धर्मभावनेचा अपेक्षित बदल होत नाही तोपर्यंत समाजही बदलणार नाही, असे त्यांना वाटे. गांधीजींनी एकाच वेळी दोघांमध्येही परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. गांधीजी समाज परिवर्तनवादी होते. परंपरा आणि प्रगतिशीलता यांचा एक अद्भुत संगम त्यांच्या विचारसरणीत होता. गांधीजीचे सारे जीवन धर्मभावनेने अणुप्रणित होते. त्यांनी इशोपनिषदातून समानता व बंधुत्व, बौध्द व जैन तत्वज्ञानातून साधनांची पवित्रता, इस्लाममधून बंधुभाव, गीतेतून कर्म, थारूपासून सत्याग्रह व रस्कि पासून शेवटच्या माणसाच्या उध्दाराचा विचार घेतला. या धार्मिक विचारसरणीनेच त्यांना समाजसेवेच्या मार्गात आणले.

गांधीजींच्या मनात एक संपूर्ण समाजाधिष्ठित समाजरचना होती. असा एक समाज जो कुठल्याही भेदभावा शिवाय परस्पर सहयोग व मैत्रीयांच्या आधारावर जगेल. धर्म, जात, वर्ण, भाषा, इत्यादीमुळे त्यात भेद पडणार नाही. गांधीजीचे विचार व कृती जनतेच्या आकांक्षाचे प्रतिरूप होती.

गांधीजींना हे पक्के माहित होते की धर्म, जात, नाती व संयुक्त परिवारांमध्ये विभागलेला हा समाज कुठल्याही मूलभूत परिवर्तनासाठी कधीही तयार नसतो. त्यासाठी गांधीजींनी वर्तमान व्यवस्थेत केवळ सुधारणा करण्याची भूमिका घेतली. परंपरेच्या बाजूनेच उभे रहायचे, पण सतत परंपरा – परिवर्तनाबद्दल बोलायचे व कार्यक्रमही तसेच आखायचे हे गांधीजींचे वैशिष्टय होते.

## व्यक्ती हे मुख्य केंद्र

समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत व्यक्तीही महत्त्वाची आहे. ती बदलली तर भोवतालचे सारे वातावरण आपोआपच बदलते. अहंकार, मीपणा, यापासून मुक्त होत जाणारा मनुष्य शेवटी स्वत:त सर्व जग पाहतो व सर्व जगात स्वत:ला पाहतो. म्हणून गांधीजी हृदय परिवर्तनावर अधिक जोर देत. समाजात व्यक्तीगत सुधारणा हवी तशी संस्थागत

सुधारणाही हवी. माणसाच्या दु:खाचे मुळ कारण त्यात असलेल्या अपूर्णता आहेत. जोपर्यंत त्याच्या या अपुर्णता दूर केल्या जाणार नाहीत तोपर्यंत सामाजिक पुननिर्माण अशक्य आहे असे गांधीजीचे मत होते.

**सामाजिक परस्परसंबंध**

मनुष्य जितका स्वावलंबी असतो तितकाच तो इतरांवर अवलंबूनही असतो. मुळात तो एक सामाजिक प्राणी असल्यामुळे समुहात समुहाशी मैत्री करणे व वेळ प्रसंगी समुहाच्या सुखदु: खात सहभागी होणे हे तो आपले कर्तव्य मानतो. गांधीजीचे हे मत होते की, ईश्वरानेच या जगाची व्यवस्था अशा पध्दतीने केली आहे. की कुठलाही स्वत: पर्यंत सीमीत ठेवू शकणार नाही. ते आपोआपच इतरामध्ये वाटले जाईल जर माणसाला इतरांची गरज नसती तर तो विलक्षण दांभिक व गर्विष्ठ झाला असता. तो कितीही मोठा असला तरी समाजाची त्याला, सतत गरज भासतेच त्याची ही सामाजिक प्रवृत्तींच त्याला पुशजगतापासून वेगळी करते खरे म्हणजे स्वाधीन असणे हा त्याचा विशेषाधिकार आहे व परस्परावलंबिता हे त्याचे कर्तव्य आहे.

**स्त्री – पुरूष समानता**

महात्मा गांधीजीचे सामाजिक विचार आणि विशेषत: महिलांविषयीच्या विचारांना अत्यंत मोलाचे स्थान आहे. त्यांनी सामाजिक सामानतेबरोबरच स्त्रीपुरूष समानतेला महत्त्व दिले आहे. समाजात स्त्रीयांना दिले जाणारे कनिष्ठ स्थान गांधींना मान्य नव्हते. स्त्रीयांना पुरेपुर स्वातंत्र्य दिले जावे. स्त्री–पुरूषांच्या दर्जा समान असावा. एवढेच नव्हे तर स्त्री–पुरूष एकमेकांना पुरक असतात गांधीजी स्त्रीयांबाबत असे म्हणतात की, ज्या जातीमध्ये किंवा देशामध्ये स्त्री जातीला मान दिला जात नाही. त्या जातीला किंवा देशाला सुसंस्कृत म्हणता येत नाही. गांधीजी म्हणतात की, भारताचे जे नंदनवन निर्माण होणार आहे त्यात पुरूषाला जो मान असेल तोच मान स्त्रीयांना असावा गांधीजी स्त्री व पुरूष असा भेदभाव कोणत्याही क्षेत्रामध्ये करत नाहीत. गांधीजी म्हणतात की स्त्री म्हणजे पुरूषांची नैतिक शक्ती होय.

**स्वदेशी**

गांधीजींच्या विचारांचा मुख्य आधार स्वदेशी आहे. स्वदेशी हे एक आवश्यक व्रत आहे. स्वदेशी म्हणजे गांधीजीचे त्या काळातील राजकीय अस्त्र होय. विदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी उदयोगाला आणि स्वदेशी उत्पादीत झालेल्या मालाला संरक्षण देणे हा या चळवळीच्या पाठीमागचा महात्मा गांधीचा मुख्य उद्देश होता. आपल्या देशातील लोकांना लागणाऱ्या आवश्यक त्या वस्तू आपल्या देशातीलच उद्योगातून निर्माण केले पाहिजे. तरच देशातला उदयोग टिकु शकतो. आणि उदयोगातून विकास साध्य होऊ शकतो. व यामुळे परदेशात जाणारी संपत्ती आपलेच मायभूमीत राहू शकते. आणि यातून राष्ट्र स्वावलंबी होऊ शकते. म्हणूनच स्वदेशी वस्तूंचा वापर या विचारावर गांधीजी आग्रही होते. महात्मा गांधीजींचे स्वदेशी चे विचार भारताच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जातात.

**ग्रामस्वराज्य**

भारत हा खेडयांचा देश ओळखला जातो भारताचा विकास हा खेडयांच्या विकासावर आधारलेला आहे. जर खेडी विकसित झाली तरच भारत विकसित होईल असे गांधीजींचे मत होते. खेडयाचा विकास करण्यातून खेडी समृध्द होतात. आणि त्यातूनच भारत देश समृध्द होतो. म्हणून खेडयाचे पुनर्रज्जीवन झाले पाहिजे असे. गांधीजींचे स्वप्न होते.

भारतातील खेडी स्वयंपुर्ण, स्वावलंबी बनली पाहिजे. ग्रामस्वराज व स्वयंपुर्ण खेडी या संकल्पनेत गांधीजीना पुढील बाबी आवश्यक होत्या. निटनिटकी ग्राम रचना, शाळा, धर्मशाळा, दवाखाना, प्राथना स्थळे, सार्वजनिक नाटयगृह, करमणुकीच्या सोई, सार्वजनिक हॉल, खेळाचे मैदान, जनावरांची राखीव व्यवस्था, मुलभूत शिक्षण इ. सर्व उपक्रम

सरकारी पध्दतीने राबवावीत तसेच स्वच्छता, पिण्याची पाण्याची व्यवस्था, दिवाबत्ती, अन्न, वस्त्र निवारा इ. बाबतीत खेडी स्वयंपूर्ण असावीत. अशा पध्दतीचे ग्रामस्वराज्याचे मौलिक विचार गांधीजीनी मांडलेले आहेत.

गांधीजी समाज परिवर्तनवादी होते. परंपरा आणि प्रगतिशीलता यांचा सुरेख अनोखा संगम त्यांच्या विचारात होता. गांधीजींना अशी समाज रचना हवी होती जी केवळ परस्पर सहयोग, प्रेम, आणि मैत्री यांच्या आधारावर असेल. जातिप्रथा, रूढीवाद, अज्ञान, अन्याय यासारख्या सामाजिक रोगावर गांधीजींनी सत्य, अहिंसा, आत्मसंयम, नम्रता आणि वचनबध्दता हे विचारांनी समाजात चैतन्य निर्माण केले.

**संदर्भ सूची**


१. गांधीविचार – डॉ. मु. ब शहा

२. गांधी – नलिनी पंडीत

३. महात्मा गांधीचे विचार – आर. के. प्रभू